मी हनुमंत रामचंद्र पाटील, वय–७८ वर्षे, व्यवसाय– शेती व सेवानिवृत्त शिक्षक, रा. बाम्हणे, ता. शिंदखेडा, जि. धुळे शपथ घेऊन सांगतो की,

**<u>वादीचा शपथेवर उर्वरित उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. एन. पी. अयाचित यांचे मार्फत</u> –**

२२. सौदा पावतीचा मजकुर लिहिणाऱ्यास कोणी सांगितला हे मला सांगता येणार नाही. नि. क्र. ४७ कडील सौदा पावतीवरील मजकुर हा वेंडर याने लिहिलेला असुन त्याचे नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर सौदा पावतीमध्ये सदर मिळकती नवीन शर्तीचे असुन त्याला परवानगीची गरज नाही असे लिहिले नव्हते. सौदा पावती मला प्रतिवादी याने लिहुन दिली आहे. मला सौदा पावती प्रकाश याने लिहुन दिलेली असुन त्याठिकाणी अन्य कोणाचेही नाव नव्हते. असे काही घडले नाही की, प्रकाश आणि अरुण यांच्याकडून मी सौदा पावती लिहुन घेतली.

२३. हे म्हणणे खरे नाही की, माझी बहिण कुरुकवाडे येथे दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, युवराज शांताराम व निळकंठ पुंडलिक हे माझे भाचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सन २००८ मध्ये प्रतिवादी प्रकाश याला दावा मिळकत विक्री करण्याची गरज नव्हती व अधिकारही नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीशी मिळकतीचा सौदा केला, किंमत ठरवली व बयाना रक्कम रु. ४०,०००/– घेतले हे सर्व मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रकाश याने मला सौदा पावती करुन दिली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रकाश याने मला विक्री परवानगी आणुन देतो असे सांगितले परंतु परवानगी आणुन दिली नाही हे देखील मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, जुन २०११ मध्ये प्रकाश याने मला दावा मिळकतीचा ताबा दिला हे देखील मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. २५.०५.२०१७ रोजी प्रकाश याला भेटुन मी खरेदी करुन देण्याची विनंती केली व त्याने ती नाकारली हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी

प्रकाश याला दोनदा नोटीस पाठविली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचा ताबा माझ्याकडे असुन मी त्याच्यामध्ये पाईपलाईन व लेव्हलींगचा खर्च केला हे देखील मी खोटे कथन करीत आहे.

२४. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी याला एकटयाला दावा मिळकत विक्री करण्याचा अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी प्रकाश हा बऱ्याच वर्षापासुन मनोरुग्ण असल्याने सुरुवातीस त्याची पत्नी व नंतर त्याचा मुलगा हे दावा मिळकतीचा कारभार बघत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी परिसरातील श्रीमंत व्यक्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला भरपूर मिळकती विकत घेण्याची इच्छा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींना दावा मिळकत मला देवुन टाका असे म्हणालो परंतु त्यांनी नकार दिला. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी माझ्या भाच्यांना हाताशी धरुन खोटे कागद तयार करुन घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याच्या आधारे मी खोटया नोटीसी पाठविल्या आहेत व खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी याच्या कुटुंबियांची दावा मिळकत हे उत्पन्नाचे एकमेव साधन आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला भरपूर उत्पन्न आहे. मला एकच मुलगा आहे. तो शेती करतो. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलं सरकारी नोकरीमध्ये मोठया पदावर नोकरीला आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केलेला असुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2025.10.16 17:28:52 +0530

स्थळ : दोंडाईचा,
दिनांक : १६/१०/२०२५

(आदित्य घ. नाईक)
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर),
दोंडाईचा